# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ Email Id – cpromhada@gmail.com


जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/२५०० दि. २४/०८/२०२१

प्रसिद्धी पत्रक

# म्हाडाच्या कोंकण मंडळातर्फे ८ हजार ९८४ सदनिकांची दि. १४ ऑक्टोबर रोजी संगणकीय सोडत

गृहनिर्माण मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरणे प्रक्रियेचा शुभारंभ

मुंबई, दि. २४ ऑगस्ट, २०२१ : कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) कल्याण, मिरा रोड, विरार, नवी मुंबई, सिंधुदुर्ग आणि ठाणे जिल्ह्यातील विविध गृहप्रकल्पांतर्गत ८ हजार ९८४ सदनिकांच्या विक्री करिता ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते आज 'गो - लाईव्ह' कार्यक्रमांतर्गत करण्यात आला. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर नागरिकांना हक्काच्या घराची शुभ बातमी मिळावी याकरिता सदनिकांच्या वितरणाकरिता प्राप्त अर्जाची संगणकीय सोडत १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहामध्ये काढण्यात येणार आहे.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात आयोजित या कार्यक्रमाला गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. योगेश म्हसे, कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन महाजन, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. विकास रसाळ, म्हाडाचे मुख्य अभियंता -२ श्री. सुनील जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनिषा जायभाये-धुळे, म्हाडाचे वित्त नियंत्रक श्री. विकास देसाई, म्हाडाचे सचिव श्री. राजकुमार सागर, मुख्य जनसंपर्क अधिकारी वैशाली गडपाले आदी उपस्थित होते

यावेळी श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते सोडती संदर्भातील माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. प्रक्रियेत सहभाग घेण्याकरिता आवश्यक त्या सर्व मार्गदर्शक सूचना व प्रणाली या माहिती पुस्तिकेत समाविष्ट आहेत. ही पुस्तिका https://lottery.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर इच्छूक अर्जदारांकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व इच्छूक अर्जदारांनी अर्ज नोंदणी आणि अर्ज भरणा करण्याआधी या माहिती पुस्तिकेचा अभ्यास करणे आवश्यक राहील.

२४ ऑगस्ट पासून सोडतीत सहभाग घेण्याकरिता अर्ज नोंदणीची सुरवात झाली असून ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी अर्ज नोंदणी करणे क्रमप्राप्त राहिल. अर्ज नोंदणीची प्रक्रिया २२ सप्टेंबर, २०२१ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत कार्यरत राहील आणि ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ - २३ सप्टेंबर, २०२१ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत असणार आहे. तसेच अनामत रक्कमेच्या ऑनलाईन स्विकृतीकरिता अंतिम दिनांक व वेळ २४ सप्टेंबर, २०२१ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत असणार आहे आणि ऑनलाईन बँकेत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा २४ सप्टेंबर, २०२१ रात्री ११. ५९ वाजेपर्यंत अर्जदारांना करता येणार आहे.

कोंकण मंडळाच्या सोडतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत ६ हजार १८० सदनिका सोडतीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये अत्यल्प उत्पन्न गटासाठी शिरढोण (ता. कल्याण, जि. ठाणे) येथे ६२४ सदनिका, खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथे ५८६ सदनिका, सर्व्हे क्रमांक १६२ खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथे २०१६ सदनिका, सर्व्हे क्रमांक १३ भंडारली (ता. जि. ठाणे) येथे १७६९ सदनिका, गोठेघर (जि. ठाणे) येथे ११८५ सदनिकांचा सोडतीत समावेश आहे.

तसेच म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी मिरारोड (ठाणे) १५ सदनिका सोडतीत आहेत. अल्प उत्पन्न गटासाठी विरार बोळींज येथील १ हजार ७४२ सदनिका, सर्व्हे क्रमांक १३ भंडारली (ता. जि. ठाणे) येथील ८८ सदनिकांचा सोडतीत समावेश आहे. मध्यम उत्पन्न गटासाठी विरार बोळींज येथे ३६ सदनिका, वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग) येथे २ सदनिका, सर्व्हे क्रमांक २१६ पीटी, २२१ पीटी मिरा रोड (जि. ठाणे) येथे १९६ सदनिका सोडतीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उच्च उत्पन्न गटासाठी सर्व्हे क्रमांक ४९१, २३ पार्ट वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग) येथे १ सदनिका सोडतीत आहे.

याशिवाय २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी चंदनसर (ता. वसई, जि. पालघर) येथे ८, वडवली (मोघरपाडा, ठाणे) येथे ७६ सदनिका, मौजे कावेसर आनंद नगर (ता. जि. ठाणे) येथे २३ सदनिका, गाव वालिव (ता. वसई, जि. पालघर) १६ सदनिका, कोपरी (ता वसई, जि. पालघर) येथे २ सदनिका सोडतीत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. अल्प उत्पन्न गटासाठी कासारवडवली (ता. जि. ठाणे) येथे १६ सदनिका, मौजे वडवली (ता. जि. ठाणे) येथे ११६ सदनिका, मोघरपाडा (ठाणे पश्चिम) येथे १ सदनिका, मौजे पारसिक नगर (ता. जि. ठाणे) येथे ३५ सदनिका, मौजे डावले (ता. जि. ठाणे) येथे २८ सदनिका, मौजे कावेसर (ता. जि. ठाणे) येथे १४० सदनिका, बालकुंभ-ठाणे येथे २१ सदनिका, भाईंदरपाडा-ठाणे येथे २४ सदनिका, अगासन-ठाणे येथे ४७ सदनिका, टिटवाळा (ता. कल्याण, जि. ठाणे) येथे ६२ सदनिका, घणसोली- नवी मुंबई सेक्टर ११ येथे ४० सदनिका, घणसोली- नवी मुंबई सेक्टर ८ येथे ५१ सदनिका, मौजे वाळीव (ता. वसई, जि. पालघर) येथे ६८ सदनिका, कोपरी (ता. वसई, जि. पालघर) येथे २० सदनिका सोडतीत विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

कोंकण मंडळाच्या सन २०२१ च्या सोडतीतील इच्छुक अर्जदारांचे अर्ज सादर करतेवेळी दि. ०१/०४/२०२० ते दि. ३१/०३/२०२१ या १२ महिन्यांच्या कालावधीतील सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न ग्राह्य धरले जाईल. त्यानुसार उपरोक्त कालावधीत अत्यल्प उत्पन्न गटासाठी (EWS) अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न २५ हजार रुपये पर्यंत असावे. अल्प उत्पन्न गटासाठी (LIG) अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न २५,००१ हजार रुपये ते ५० हजार रुपयापर्यंत असावे तसेच मध्यम उत्पन्न गटासाठी (MIG) अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न ५०,००१ रुपये ते ७५ हजार रुपयापर्यंत असावे. उच्च उत्पन्न गटासाठी (HIG) अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न ७५ हजार रुपयांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर अत्यल्प उत्पन्न गटातील अर्जदाराला अर्जासोबत ५ हजार रुपये इतकी अनामत रक्कम भरावयाची आहे. तसेच अल्प उत्पन्न गटाकरीता १० हजार रुपये, तर मध्यम उत्पन्न गटातील अर्जदाराला १५ हजार रुपये व उच्च उत्पन्न गटातील अर्जदाराला अर्जासोबत २० हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे. सोडतीनंतर यशस्वी अर्जदार वगळून इतर सर्व अर्जदारांच्या अनामत रकमेचा त्यांच्या खात्यामध्ये परतावा केला जाणार आहे. तसेच या सोडतीकरिता रु. ५६० रुपये प्रति अर्ज शुल्क आकारण्यात येणार आहे.

कोंकण मंडळाच्या सोडतीत सहभाग घेणाऱ्या इच्छूक अर्जदारांकरिता https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर सोडतीबाबत मार्गदर्शन करणारी माहिती पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व इच्छूक अर्जदारांनी अर्ज नोंदणी आणि अर्ज भरणा करण्याआधी या माहिती पुस्तिकेचा अभ्यास करणे आवश्यक राहील.

सदनिकांच्या वितरणासाठी म्हाडाकडे पारदर्शक संगणकीय सोडतीची एकमेव प्रक्रिया आहे याव्यतिरिक्त म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. सोडत

प्रक्रियेबाबत अथवा सदनिका मिळणेबाबत अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तींशी परस्पर व्यवहार करू नये, तसे केल्यास कोंकण मंडळ कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही, असे आवाहन, कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन महाजन यांनी केले आहे. सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदारांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करण्याकरिता आणि संगणकीय सोडत प्रणालीच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याकरिता सन २००९ पासून उच्च स्तरीय देखरेख समिती कार्यरत आहे. कोंकण मंडळाच्या २०२१ च्या सोडतीसाठी देखील त्रिसदस्यीय उच्च स्तरीय देखरेख समिती कार्यरत आहे, अशी माहिती श्री. महाजन यांनी दिली .

**तळई गावातील दरड ग्रस्तांसाठी उभारण्यात येणाऱ्या सदनिकांच्या प्रतिकृतीची गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी केली पाहणी**

अतिवृष्टीमुळे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत रायगड जिल्ह्यातील तळई गाव व आजूबाजूच्या वाड्यांमधील घरे उद्ध्वस्त होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी झाली. निसर्गाच्या या अवकृपेनंतर तळई गावातील ६३ व आजूबाजूच्या पाड्यातील १६१ अशा एकूण २६१ घरांची उभारणी करून नागरिकांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणावर (म्हाडा) सोपविली आहे. त्या दृष्टीने म्हाडातर्फे नियोजन करण्यात येत असून पुनर्वसन घरांची प्रतिकृती म्हाडामार्फत वांद्रे येथील मुख्यालयाच्या प्रांगणात तयार करण्यात आली आहे. सदनिकांच्या प्रतिकृतीची पाहणी गृहनिर्माण मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड यांनी आज केली.

या प्रसंगी श्री आव्हाड यांनी सांगितले की, हा पुनर्वसन प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबविला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात तळई गावातील ६३ कुटुंबासाठी घराची उभारणी येत्या दिवाळी पर्यंत केली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात आजूबाजूच्या पाड्यातील १६१ कुटुंबियांसाठी घरांची उभारणी केली जाणार आहे. या घरांची उभारणी मार्च २०२२ पर्यंत करण्याचा म्हाडाचा प्रयत्न असेल.

रायगडच्या जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून व गावातील नागरिकांच्या गरजांचा विचार करून लेआऊट तयार केला जाणार आहे. या लेआऊटमध्ये जनावरे बांधायची जागा, शेतीचे सामान ठेवण्यासाठी जागा आदी बाबींचा विचार केला जाणार आहे. प्री फॅब तंत्रज्ञानाने या घरांची उभारणी केली जाणार असून गावकरी, स्थानिक लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्याशी विचार विनिमय करून घराच्या आराखड्याला अंतिम रूप दिले जाणार आहे, अशी माहिती श्री. अनिल डिग्गीकर यांनी दिली.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण


Nikon D7500, 18mm, f/4, 1/60s

